# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. १६४-२३** **दिनांक :- २१/०५/२०२३**

## चोरी केलेल्या मोटारसायकलच्या सहाय्याने जबरी चोरी करणा-या सराईत आरोपीतास अटक- गुन्हे शाखा, कक्ष-3 विरार यांची कामगिरी.

-------00000-------

अर्नाळा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २९/०४/२०२३ रोजी सायंकाळी १८.०० वा.चे सुमारास गोकुळ गॅलेक्सी गोकुळ टाऊनशिप, आगाशी रोड, बोळींज, विरार पश्चिम, ता. वसई, जि.पालघर येथे फिर्यादी नामे श्रीमती गंगाबाई यशवंत गोरीवले, वय ८० वर्षे, या सोसायटीचे आवारातील कट्टयावर बसलेल्या असताना दोन अनोळखी इसम त्यापैकी पाठीमागील बसलेला इसम वय अंदाजे २२ ते २३ वर्षे, अंगाने सडपातळ, अंगात सफेद रंगाचा शर्ट व काळया रंगाची फुल पॅन्ट व गाडी चालविणारे इसमांने डोक्यात हेल्मेट घातलेला अंगाने सडपातळ वय अंदाजे २२ ते २३ वर्षे असे मोटार सायकलवर येवुन फिर्यादीचे बिल्डींगचे समोर त्यांची मोटार सायकल उभी करून पाठीमागे बसलेला इसम पायी चालत फिर्यादी जवळ येवुन फिर्यादीचे गळयातील ११ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन जबरीने खेचुन मोटारसायकलवरुन विरारच्या दिशेन पळुन गेल्याने फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अर्नाळा सागरी पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. १५८/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३९२, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील वसई-विरार परिसरात गेल्या काही महिन्यापासुन जबरी चोरी, बतावणी व मोटारसायकल चोरीच्या गुन्हयांत वाढ झाल्याने सदर घटनांची वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीत यांचा शोध घेवुन गुन्हयास पायबंद करणेबाबत सुचना व मार्गदर्शन केले होते.

सदर गुन्हा उघडकीस आणणेबाबत वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा, कक्ष ३ विरारचे पोलीस पथकाने गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाव्दारे प्राप्त माहितीच्या आधारे आरोपीत नामे शाहीद अब्दुल सतार कापडीया, वय ३३ वर्षे, रा. फरीदा मंझील जी-१, तळमजला, कब्रस्तान रोड, वापी गुजरात यास दिनांक २०/०५/२०२३ रोजी ताब्यात घेवुन तपास केला असता त्याने वरनमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. तसेच वर नमुद आरोपीताकडे अधिक तपास करता त्याने गुन्हया करण्यासाठी वापरलेली २०,०००/- रुपये किंमतीची मोटार सायकल हस्तगत करुन ०३ गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत.

### -:उघडकीस आलेले गुन्हे:-

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नंबर, कायदा व कलम |
|---|---|---|
| १ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | १५८/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३९२, ३४ प्रमाणे. |
| २ | तुळींज पोलीस ठाणे | ३३९/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३९२, ३४ प्रमाणे. |
| ३ | विरार पोलीस ठाणे | ४४२/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९,३४ प्रमाणे. |

नमुद आरोपीताविरुध्द काशिमीरा व विलेपार्ले, मंबई शहर येथे अशाचा प्रकारे गुन्हे दाखल असुन उक्त आरोपीत यास पुढील कारवाई करीता विरार पोलीस ठाणेत हजर करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाख कक्ष ०३ विरारचे पो.नि. श्री. प्रमोद बडाख, पो.उप.नि. शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सचिन घेरे, सागर बारावकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अंम. राकेश पवार, सुमित जाधव, म.सु.ब. प्रविण वानखेडे, सागर सोनवणे, गणेश यादव तसेच स.फौ. संतोष चव्हाण नेम. सायबर सेल यांनी कलेली आहे.



----oooo----